अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## घाटणे शिवारात बिबट्या सदृश प्राण्याचा शेळीवर हल्ला

**सोलापूर/प्रतिनिधी**

माढा तालुक्यातील घाटणे परिसराच्या शिवारात बिबट्या सदृश प्राण्याच्या आगमनाने भीतीचे वातावरण निर्माण झाल आहे. या प्राण्याने शेतकरी हनुमंत सरडे यांच्या शेळीला फस्त करण्यासाठी हल्ला केला. दोन दिवसापासून घाटणे शिवारात बिबट्या सारखा प्राणी असल्याची शंका बबन माळी यांना आली. रविवारी मध्यरात्री बिबट्याने हनुमंत सरडे यांची शेळी पकडताना स्वतः त्यांनी पाहिले. डोळ्यावर ब्याटरीचा प्रकाश पडताच तो प्राणी शेजारी असणारे शेतकरी शंकर मुसळे यांच्या तुरीच्या पिकामध्ये शिरला. याबाबत वनविभागकडे तक्रार नोंदवण्यात आली. त्याच्या मार्गावरून शोध लावण्याचा प्रयत्न केले. परंतु बिबट्या पळून गेला. घाटणे, सापटणे म्हैसगाव शिवारात बिबट्या फिरत असल्याची माहिती मिळताच वनपाल बाबासाहेब लटके, वनरक्षक गायकवाड, वनसेवक नितीन यादव यांनी संबंधित स्थळांना भेट देऊन आढावा घेऊन वरिष्ठांकडे अहवाल सादर केला.



# आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ

## नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी**

निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्ह्यात विधानसभा निवडणूक प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. मंगळवार, २२ नोव्हेंबर पासून उमेदवार अर्ज भरण्यास प्रारंभ होणार आहे. फॉर्म विक्री व स्वीकृती सुरू झाली आहे. उमेदवारांनी सूचनांचे अवलोकन करून नामनिर्देशन पत्र दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

संबंधित तालुक्याचे तहसीलदार अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्याकडे ऑनलाइन सादर केलेल्या नामनिर्देशनची प्रत २२ ते २९ ऑक्टोंबर सकाळी ११ वा पासून ते दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करायचे आहे. सर्व साधारण उमेदवारांसाठी १० हजार तर अनुसूचित जाती,अनुसूचित जमातीसाठी उमेदवारांसाठी ५ हजार अनामत रक्कम आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करणाऱ्या उमेदवारांनी या सर्व बाबींची नोंद घेऊन निर्धारित वेळेत अर्ज दाखल करावयाचे आहेत, असेही जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी म्हटले आहे.



यावेळी शहर मध्य, उत्तर व दक्षिण निवडणूक कार्यालयात सदाशिव पडदुने, शिंदे यांनी ईव्हीएम मशीन बद्दल, नाम निर्देशन फॉर्मभरण्याबात सविस्तर मार्गदर्शन करण्याता आले.




### असा असणार निवडणूक कार्यक्रम

२२ ते २९ आक्टोबर नामांकन सादर करणे, ३० रोजी छाननी, ४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज माघारी व चिन्ह वाटप. २० नोव्हेंबर रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदान व २३ रोजी मतमोजणी होणार आहे. मतमोजणीचे ठिकाण नंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

### इथे मिळणार अर्ज

सुविधा ॲप किंवा शहरातील किंवा स्थानिक महा ई सेवा केंद्रात उमेदवारी अर्ज डाउनलोड करून सविस्तर भरावे. अपूर्ण भरलेला अर्ज किंवा योग्य ती कागदपत्रे सोबत जोडली नसेल तर अर्ज स्वीकारण्यात येणार नाही. अनामत रक्कम पावती व इतर माहितीसह परिपूर्ण भरलेला अर्ज ऑफलाईन तहसीलदार अथवा उप जिल्हा अधिकारी यांच्याकडे सकाळी ११ ते ३ या वेळेत सादर करण्यात यावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.



सोलापूरः विश्वास काटकर यांच्याशी चर्चा करताना आंबेडकर ट्रेड युनियनचे पदाधिकारी.

## बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांबाबत विश्वास काटकर यांच्याशी चर्चा

**सोलापूर** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सोमपा मधील विविध संवर्गातील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे राज्याचे सरचिटणीस विश्वास काटकर यांची समक्ष भेट घेऊन केली चर्चा केली. विश्वास काटकर साहेब हे अचानक सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता ट्रेड युनियनचे अध्यक्ष कामगार बापूसाहेब सदाफुले यांनी सोमपामधील विविध संवर्गातील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासंदर्भात समक्ष भेट घेऊन चर्चा केली. काटकर यांनह कोणाचेही सरकार येऊ द्या राज्य मध्यवर्ती संघटनेची ज्यावेळेस पहिली बैठक शासन,प्रशासनाबरोबर लागेल त्यावेळी बैठकीत आवाज उठवला जाईल असे आश्वासन दिले. यावेळी खजिनदार अरुण मेत्रे, प्रमुख संघटक सुनील शिंदे, बिबीशन गायकवाड, श्रीकांत भंडारे, शंतनू गायकवाड साहेब,खंडू भोसले,नितीन कसबे,अविनाश गोडसे,राजीव साळुंखे ,नितीन कसबे,मंजुनाथ गायकवाड, रवी नष्टे, अमृत कोकाटे, विवेक लिंगराज, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### महिलेकडून सत्तुरने मारहाण; तरुण जखमी

लष्कर परिसरातील १४ नंबर शाळेजवळ तू नेहमी घरात तक्रार का करते? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून डोक्यात सत्तुरने केलेल्या मारहाणीत भगत सीताराम सखी (वय ३० रा.लष्कर) हा तरुण जखमी झाला. ही घटना रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात मोनिका (पत्नी) हिने दाखल केले. त्याला आरती सतीश बाबावाले हिने मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

### टायर फुटल्याने टेम्पो उलटून एक जखमी

सोलापूर ते तुळजापूर मार्गावरील सुरतगाव येथे टेम्पोचे मागील टायर फुटल्याने टेम्पो उलटून भरत नागेश लिंबोळे (वय २६ रा. सोलापूर) हा जखमी झाला. सोमवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास हा अपघात घडला.टेम्पो सोलापूरहून तुळजापूरच्या दिशेने निघाला होता. जखमीला उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिव्हील पोलीस चौकीत या अपघाताची प्राथमिक नोंद झाली आहे.

## सिद्धनाथ कारखान्याचा बॉयलर प्रदीपन सोहळा उत्साहात

**दक्षिण सोलापूर** : तिऱ्हे येथील सिद्धनाथ शुगर मिलच्या २०२४-२५ च्या गळीत हंगामाचा आज शुभारंभ झाला. सोमवारी सकाळी ९ वाजता कारखान्याचे चेअरमन श्री दिलीप माने, संचालक पृथ्वीराज माने आणि धनंजय भोसले यांच्या हस्ते बॉयलरचे पूजन करून अग्निप्रदीपन सोहळा पार पडला.



दक्षिण सोलापूरः सिद्धनाथ कारखान्याचा बॉयलर प्रदीपन सोहळ्याप्रसंगी दिलीप माने, धनंजय भोसले, पृथ्वीराज माने व इतर.

या प्रसंगी तिऱ्हे गावचे सरपंच गोवर्धन जगताप, भास्कर सुरवसे, प्रोजेक्ट मॅनेजर विनोद पाटील, जनरल मॅनेजर संजीवकुमार जाधव, शेतकी विभागाचे मुख्य अधिकारी बाळासाहेब काळे यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते. शेतकरी हाच आपला केंद्रबिंदू असल्याचे सांगताना कारखान्याचे चेअरमन माने यांनी आगामी गाळप हंगामाचे उदिष्ट स्पष्ट केले. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर यंदाच्या हंगामाची सुरुवात होईल. या गाळप हंगामात ५ लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यंदा देखील **कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील एकाही शेतकऱ्याचा ऊस गाळपावाचून शिल्लक राहणार नसल्याचे आश्वासन त्यांनी यावेळी कारखाना प्रशासन आणि कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना सहकार्य करावे असे आवाहन केले. सिद्धनाथ कारखान्याने आपल्या ऊस उत्पादक, पुरवठादार शेतकरी सभासदांना दिवाळीनिमित्त २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर या कालावधीत कारखान्याचे सभासद आणि २०२३-२४ च्या गाळप हंगामातील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना २५ रुपये प्रति किलो दराने २० किलो साखर देण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांचे हित हेच आमचे ध्येय आहे असे म्हणत श्री माने यांनी शेतकऱ्यांनी या निर्णयाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

## करकंब येथे विहिरीत क्रेन पडल्याने १ ठार १ जखमी

**सोलापूर** : विहीर खोदत असताना टायर स्लिप होऊन क्रेन विहिरीत पडल्याने एक जण ठार तर ऑपरेटर गंभीर जखमी झाला. हा अपघात उंबरे करकंब (ता. पंढरपूर) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला.

गणेश बजरंग खरात (वय २५ रा.परमेश्वर पिंपरी ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे. तर राहत हुसेन (वय ३० रा.उत्तर प्रदेश) या जखमी ऑपरेटला उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गणेश खरात हा क्रेनचा मालक असून राहत हुसेन हा क्रेनवर ऑपरेटर म्हणून काम करतो.

गेल्या चार दिवसापासून उंबरे करकंब येथील शेतात विहीर खोदण्याचे काम चालू होते.


दोघेही क्रेन मधे बसून काम करीत असताना सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अचानक तोल जाऊन क्रेन विहिरीत कोरूळला. त्यात दोघे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी गणेश खरात हा उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## सहाय्यक आयुक्त पंडित यांच्याकडे प्राथमिक शिक्षण विभागाचा कार्यभार

**सोलापूर/प्रतिनिधी**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. तसे कार्यालयीन आदेश महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी काढले आहेत. दरम्यान, आज सोमवारी सकाळी त्यांनी पदभार घेतला.

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी संजय जावीर यांना पदोन्नतीने शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई, पश्चिम विभाग, मुंबई येथे पदस्थापना देण्यात आलेली आहे. दरम्यान, येथील येथील रिक्त प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार आस्थापनेवरील वर्ग-२ अधिकाऱ्याकडे सोपविण्याबाबत



शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांनी विनंती केलेली आहे. त्यानुसार सोलापूर महापालिकेतील सहाय्यक आयुक्त गिरीष पंडीत यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यतच्या कालावधीसाठी महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या प्रशासन अधिकारीपदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे, असे महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांनी आदेशात म्हटले आहे. सोमवारी सकाळी ११ वाजता महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी नवी पेठ येथील महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या कार्यालयात प्रशासन अधिकारी पदाचा पदभार घेतला. यावेळी मनपा शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक मनीष बांगर यांच्या हस्ते प्रशासन अधिकारी पंडित यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य लिपिक माहेजबीन शेख, लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक भगवान मुंडे, संतोष बुलबुले, रजनी राऊळ, निलोफर सय्यद, महेश वालावलकर, सारंग अंजिखाने , अविनाश शिंदे, रियाज आतार , अमोल गायकवाड, गुरुप्रसाद तलवार, सचिन जाधवर , सौदागर वाघमारे, रतन साळवे, अशिकेष लोखंडे , सुवर्णा गुरव, प्रभा चव्हाण, रूपाली कंची, भालचंद्र साखरे, नरसिंग चिप्पा, नासीर खान, सायली ढोले, सचिन साखरे आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

## वाहन चालकांना लुटणाऱ्या चौघा दरोडेखोरांना अटक




### ग्रामीण पोलिसांची कामागिरी

**सोलापूर** : टेंभूर्णी ते पंढरपूर महामार्गावरील परीते पाटीजवळ पिकप चालकावर कोयत्याने हल्ला करून ऐवज लुटल्याच्या गुन्ह्यातील ४ फरार आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी नुकतीच अटक केली. त्यांच्या ताब्यातून १ लाखांचा माल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे .

ओम उर्फ बंटी कृष्णा साळुंखे (वय २०), अभिषेक अभिमन्यू पवार (वय २५), राजू अमीन शेख (वय ३२ सर्व रा. अकलूज ता.माळशिरस) आणि बापू विष्णू हाके (वय २० रा.म्हाळुंग ता.माळशिरस) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. संदीप जाधव (रा.जैनापूर,विजयपूरा) हे चाकण (जि. पुणे) येथे बकरीचा व्यापार करून पिक-अप वाहनातून विजयपूरकडे निघाले होते. ५ ऑक्टोबर रोजी पहाटेच्या टेंभूर्णी येथून पंढरपूर मार्गे जात असताना परीते पाटीजवळ पाठीमागून मोटार सायकलवरून आलेल्या अज्ञात चोरट्यांनी कोयत्याने वार करून त्यांचे कडील रोख रक्कम, दोन मोबाईल असा एकूण २ लाख ५७ हजाराचा माल लुटून नेला होता. याबाबत टेंभूर्णी पोलीसात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला होता. गुन्ह्यातील आरोपी हे माळशिरस तालुक्यातील असून ते सर्व अकलूज येथे येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. त्याप्रमाणे पोलिसांनी वरील चौघांना अटक करून लुटून नेलेला काही मुद्देमाल जप्त केला.

### यांन केली कामगिरी

ही कामगिरी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, प्रितम यावलकर (अपर पो.अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक सुरेश निंबाळकर , हवालदार रविराज कांबळे, सहा.फौजदार निलकंठ जाधवर, प्रकाश कारटकर, विरेश कलशेट्टी, धनराज गायकवाड, अजय वाघमारे, अन्वर आत्तार, राहूल दोरकर, हरीश थोरात, बाळराजे घाडगे, सुनिल पवार यांनी केली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



नका सोडुन जाऊ रंगबहार!!!

कल्याण
178-62-480

मुंबई
800-89-568

# नाराजांची समजूत काढण्याचे आता दोन्ही देशमुखांपुढे आव्हान

**सोलापूर/प्रतिनिधी**

भाजपची पहिली यादी जाहीर झाली. यामध्ये शहर दक्षिणमधून आ. सुभाष देशमुख तर उत्तरमधून आ. विजयकुमार देशमुख यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. या दोन्ही देशमुखांनी उमेदवारी मिळवण्यात जरी यश मिळवले असले तरी पक्षातील माजी नगरसेवकांची आणि पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे. यात ते कितपत यशस्वी होतात यावर त्यांचे जय-परायजयाचे गणित अवलंबून असणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडवरच आ. सुभाष देशमुख आणि आ. विजय देशमुख यांना त्यांच्याच पक्षातील माजी नगरसेवकांनी जोरदार विरोध केला. सुभाष देशमुख गटातीत उपमहापौर राजेश काळेंसह सहा नगरसेवकांनी देशमुखांविरोधात



बंड करत त्यांना उमेदवारी न देण्याची मागणी केली. शहर उत्तरमध्येही दक्षिण सारखीच परिस्थिती झाली. माजी महापौर शोभा बनशेट्टींसह अनेक माजी नगरसेवकांनी विजय देशमुखांना उमेदवारी देऊ म्हणून पवित्रा घेतला. या सर्व लोकांनी सांगर बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेतली. असे असताना पक्षाने मात्र पुन्हा एकदा दोन्ही देशमुखांवरच विश्वास टाकला. आता हे दोघे पक्षातील नाराजांची समजूत कशी काढणार याकडे सर्वांचे लक्ष आहे. सुभाष देशमुख यांना शहरी भागातून जास्त मतदान होते हे मागच्या दोन निवडणुकीत दिसून आले. त्यामुळे त्यांना या नाराज लोकांची समजूत घालणे आवश्यकच बनले आहे. हे ओळखून आता त्यांचे चिरंजीव मनिष देशमुख यांनी पुढाकार घेण्या सुरूवात केली आहे. त्यांनी नाराजांची समजूत घालण्यास सुरूवात केली आहे. त्यांनी माजी नगरसेवकांच्या गाठीभेटी घेण्यास सुरूवात केली आहे. आता यात कितपत यश येते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. नुकतेच कर्नाटकातील एका खासदारांनीही या सर्व माजी नगरसेवकांची भेट घेत त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. दुसरीकडे विजय कुमार देशमुख यांच्या विरोधातील नाराज माजी नगरसेवकांची एक बैठक होणार आहे. त्यात पुढील निर्णय घेणार असल्याची माहिती आहे. विजयकुमार देशमुख यांच्याकडून या नाराज लोकांची समजूत काढण्यासाठी प्रदेशवरून एका नेत्याला पाठवले जाणार असल्याचे कळते. दोन्ही देशमुख नाराजांची समजूत कशी काढणार, त्यांना शब्द कोणता देणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

### माजी नगरसेवक प्रचाराला तयार पण...

दोन्ही देशमुखांवर नाराज झालेले माजी नगरसेवक दोघांचाही प्रचार करण्यास तयार आहेत. मात्र आगामी काळात महापालिकेत उमेदवारी देताना दोन्ही देशमुख अडथळा करतील अशी शक्यता या माजी नगरसेवकांना वाटत आहे. त्यामुळे आम्हाला वरिष्ठ नेत्यांकडून शब्द हवा आहे, असे सर्वांचे म्हणणे आहे.

## खेड शिवापूर टोल नाक्यावर ५ कोटींची रोकड जप्त

**पुणे** : महाविकास आघाडी व महायुतीमधील अन्य घटक पक्षांच्या उमेदवार याद्या पुढील काही तासात जाहीर होण्याची शक्यता आहे. २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरूवात होणार असून त्या आधीच पुण्यात मोठं घबाड सापडले आहे. एका कारमधून पोलिसांनी ५ कोटी रुपयांची रक्कम जप्त केली आहे.राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झालेली असताना येथील खेड शिवापूरच्या परिसरात खासगी वाहनातून मोठी रक्कम जप्त करण्यात आली आहे. खासगी वाहनातून अंदाजे पाच कोटी रुपये पोलिसांनी जप्त केले आहेत. ही गाडी पुण्यातून कोल्हापूरच्या दिशेने जात होती. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता नियमानुसार पुणे ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.